म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५४६९
१०२५
REFBK-0003713
REFBK-0003713

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५४८

# ऐतिहासिक पोवाडे.

( भाग दुसरा. )

## पेशवाई.

3093
REFBK-0003713

गोविंद गोपाळ देसाई.

मत १॥ आणा.

श्री.

# प्रकाशकाचें निवेदन.

कवि रामचंद्र शंकर दळवी यांनीं केलेले पहिले बाजीराव, शके १५२० ते १७४० पर्यंतची मराठे शाहीची हकीकत ( पांच अंकी नाटक ), व सरदार बापू गोखले हे तीन पोवाडे छापले असून, " नारायणराव पेशवे यांचा वध, व खडर्यांची लढाई हे दोन पोवाडे आकर्थ आणि शाळिग्राम यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून घेतले असून मूळच्या कवित्वांत जरूर तो फरक करून व नवीन कवित्वाची थोडी भर घालून पेशवाईचे शक्य तितके पोवाडे एका पुस्तकांत असावे अशा उद्देशानें ह्या पुस्तकांत छापले आहेत. रसिकजनांनीं ह्या लहानशा पुस्तकाचा फायदा घेऊन **श्री गोपाल गायन समाज** या संस्थेस उपकृत करावें अशी विनंति आहे.

सर्वांचा नम्र–

**गोविंद गोपाळ देसाई.**

प्रमुख श्रीगोपाल गायन समाज पुणें.

स. काव्य ७ काव्य सं. ७९ ३७९३

# ऐतिहासिक पोवाडे.

## भाग दुसरा.

### १ श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा पोवाडा.

ब्रम्हवंशी तेजोराशी धन्य बाजीराव ज्याचा करारी स्वभाव रणांगणीं सुप्रभाव शिंदे होळकर उमराव गर्जे नउ खंडी नांव ज्याला साह्य शाहू छत्रपती, छत्रपती हो पाहुनी वैरी कापती ॥ धृ० ॥ वडिल गेले स्वर्गीं झाले ब्रम्हानंदीं स्वार आवरून दुःखादि विकार प्रधानपद अधिकार वस्त्रें मिळवाया हुशार मित्र घेऊन आले चार आबा पुरंदरे कारभारी, कारभारी हो शाहू छत्रपती दरबारीं ॥ पाहून अर्जी बहाल मर्जी शाहू कृपानिधी अष्टप्रधान त्यामधीं प्रतिकूळ प्रतिनिधी मनिं धरुनि कुबुद्धि बळें लाउनीया रूदी म्हणे आम्हावरी अधिकारी, अधिकारी हो कोकणस्थ नसावा निरधारी ॥ उद्यां पाहूं परवा पाहूं काम आटोकाट त्यांत महिने गेले आठ करून बाजीराव थाट घेउनी महाराजाची गांठ म्हणे माझी काय वाट कां जावें परत माघारी, माघारी हा दिलें वचन त्याच आवसरीं ॥ चाल ॥ इतुक्यांत औरंगाबादेहून वकिल आले दोन पत्र घेऊन निजाम उलमुलखाचें हो, सही शिक्क्याचें ॥ बादशहाची कोपली मर्जी फौज आली फर्जी करितों मी आर्जी बांधुनी मोर्चे हो, साह्य करा आमुचें ॥ सेना पंचविस हजार हुजूरची राउत घोडा बरची देऊं आम्ही खर्चीं काय पैक्याचें हो, वचन घ्या साचें ॥ चा० दु० ॥ त्यास देउनी वचन आधार, माहाराजांनीं केला दरबार, प्रतिनिधिस पुसतां सुविचार हो, आलें उत्तर, फौज नाहीं

श्री.

# प्रकाशकाचें निवेदन.

कवि रामचंद्र शंकर दळवी यांनीं केलेले पहिले बाजीराव, शके १५२० ते १७४० पर्यंतची मराठे शाहीची हकीकत (पांच अंकी नाटक), व सरदार बापू गोखले हे तीन पोवाडे छापले असून, " नारायणराव पेशवे यांचा वध, व खर्ड्यांची लढाई हे दोन पोवाडे आकर्थ आणि शाळिग्राम यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून घेतले असून मूळच्या कवित्वांत जरूर तो फरक करून व नवीन कवित्वाची थोडी भर घालून पेशवाईचे शक्य तितके पोवाडे एका पुस्तकांत असावे अशा उद्देशानें ह्या पुस्तकांत छापले आहेत. रसिकजनांनीं ह्या लहानशा पुस्तकाचा फायदा घेऊन **श्री गोपाल गायन समाज** या संस्थेस उपकृत करावें अशी विनंति आहे.

सर्वांचा नम्र–

**गोविंद गोपाळ देसाई.**

प्रमुख श्रीगोपाल गायन समाज पुणें.

स. काव्य ५१
काव्य ५. ०९
३०९३

# ऐतिहासिक पोवाडे.

## भाग दुसरा.

### १ श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा पोवाडा.

ब्रम्हवंशी तेजोराशी धन्य बाजीराव ज्याचा करारी स्वभाव रणांगणीं सुप्रभाव शिंदे होळकर उमराव गर्जे नउ खंडी नांव ज्याला साह्य शाहू छत्रपती, छत्रपती हो पाहुनी वैरी कापती ॥ धृ० ॥ वडिल गेले स्वर्गी झाले ब्रम्हानंदीं स्वार आवरून दुःखादि विकार प्रधानपद अधिकार वस्त्रें मिळवाया हुशार मित्र घेऊन आले चार आबा पुरंदरे कारभारी, कारभारी हो शाहू छत्रपती दरबारीं ॥ पाहून अर्जी बहाल मर्जी शाहू कृपानिधी अष्टप्रधान त्यामधीं प्रतिकूळ प्रतिनिधी मनिं धरुनि कुबुद्धि बळें लाउनीया रूंदी म्हणे आम्हावरी आधिकारी, आधिकारी हो कोकणस्थ नसावा निरधारी ॥ उद्यां पाहूं परवा पाहूं काम आटोकाट त्यांत महिने गेले आठ करून बाजीराव थाट घेउनी महाराजाची गांठ म्हणे माझी काय वाट कां जावें परत माघारी, माघारी हा दिलें वचन त्याच आवसरीं ॥ चाल ॥ इतुक्यांत औरंगाबादेहून वकिल आले दोन पत्र घेऊन निजाम उलमुलखाचें हो, सही शिक्याचें ॥ बादशहाची कोपली मर्जी फौज आली फर्जी करितों मी आर्जी बांधुनी मोर्चे हो, साह्य करा आमुचें ॥ सेना पंचविस हजार हुजूरची राउत घोडा बरची देऊं आम्ही खर्चीं काय पैक्याचें हो, वचन घ्या साचें ॥ चा० दु० ॥ त्यास देउनी वचन आधार, माहाराजांनीं केला दरबार, प्रतिनिधिस पुसतां सुविचार हो, आलें उत्तर, फौज नाहीं

खिल्लक भरपूर ॥ जाण्यासारखा नाहीं कोणी वीर, वकिलासी देउं नका धीर, शाहू म्हणे भले बाहादूर हो, प्रधान तुम्ही चतुर, पुढें राज्य कसें हाकणार ॥ मग आबाजी पुरंदरे वीर, आणविला सभेंत सत्वर, सांगता त्यास समाचार हो, त्याचें उत्तर, द्या हुकुम आम्ही तयार ॥ मोड ॥ त्याच घडी तातडी बाजीराव प्रधान वस्त्रें देऊन केला मान करुन मुजरा सप्रमाण मग चढविली तुमान म्हणे पाहिन मुसलमान शिंदे होळकर संगें तळपती, तळपती हो पाहुनी वैरी कापती ॥ १ ॥ वकिलासी म्हणे खाशी तुम्ही धरा वाट आम्ही येतों पाठोपाठ स्वारी खर्च लक्ष साठ रुपये धाडा येवढी आट मुकास्यानें बिनबोभाट पुढें जाऊन तुम्ही सत्वरीं, सत्वरींहो सांगा निजामासी लौकरी ॥ चतुरंग सेनासंघ पंचविस हाजार पायदळ घोडेस्वार तोफा बंदुका आपार सर्व जातीचे सरदार रणवाद्याचा पुकार चौघडा गर्जे अंबरीं, अंबरीं हो मेघनाद उठला खरोखरी ॥ जाऊन भिडलें घाट चढले हर्ष निजामास अल्ला आकबर खास खुदा सामील आम्हास रुपये देउनी खर्चास बाजीराव प्रधानास आणविलें आपुल्या घरीं, आपुल्या घरीं हो सभा केली निवडक मानकरी ॥ चा० ॥ तेव्हां निजाम स्त्रियांनीं सत्वरीं बाजीरावावरी उधळले तरी दोन पायली मोतीं हो, करुनी पंच्यारती ॥ निजामानें केला प्रणिपात जोडुनी हात आगे क्यौं बात सुनो येकांतीं हो, हमे बडी भीती ॥ केला विचार मग मोकळा निवेदुनी कळा म्हणे तुम्ही पळा सैन्य सांगाती हो, दिल्लीकडे निगुती ॥ चा० दु० ॥ मग लढाइ करुनी खोटी, निजाम पुढें पेशवे पाठी, दिल्लीची फौज आली मोठी हो, तिची आडकाठी, पहिल्या धडकेंत केली उफराटी ॥ बादशहाला निजाम मग दाटी, आम्ही झटतों दौलती-साठीं, क्या करना गनिम लगे पाठी हो, भीति आहे पोटीं, सैतान बाजी बडा हाट्टी ॥ तह करावया आटाआटी, वकिलांनीं घेतल्या भेटी, दिल सफाई झाली उठाउठीं हो, खर्चासाठीं, बादशहानें रुपये दिले कोटी ॥

॥ मोड ॥ सरदेशमुखी घेउन सुखी बाजीराव भाई खंडणी घेउन चौथाई येउन साताऱ्यासी धाई नमन केलें शाहु पाइ शौर्य पाहुन लवलाही झाले प्रसन्न तेव्हां भूपती, भूपती हो पाहुनी वैरी कापती ॥ २ ॥ क्षात्रवंशीं राजा हौसी बुंदेल खंडावर छत्रसाल तो निबर त्याची घ्यावया खबर बादशहानें जबर सैन्य धाडिलें गबर जसा चंद्र भितो राहुसी, राहुसी हो तो मागें मदत शाहुसी ॥ पाहुन विनति शाहू चित्तीं द्रवले अंतरात बाजीरावासी जोरात हुकूम दिला रातोरात बुंदेलखंड दरबारांत साह्य करावें समरांत वीरकंकण बांधुनी बाहुसी, बाहुसी हो आले पेशवे समर-भूमिशी ॥ लाउनी आट आटोकाट देउनी लढाई वैरी मारून ठाइठाई रणधुमाळीची धाइ ऱ्याले मुसलमान भाई झाले मराठे विजइ बादशहाच्या घेऊन अबरुसी, अबरुसी हो सारें बुंदेलखंड झालें खुषी ॥ चाल ॥ मग छत्रसाल रायानें मोठ्या विनयानें दिली भूषणें बाजीरावासी हो, केलें संतोषी ॥ मला पुत्र आहेत दोन तुमच्यासह तीन मोठ्या प्रीतीनं राज्याची खाशी हो, तिजाई दिली त्यासी ॥ इतक्यांत दिल्लीहून आली फौज पुन्हा भली शाहजतखान आल्ली हुकूम होता त्यासी हो, धरावें निजामासी ॥चा०॥ निजामाला संकट भारी, आले वकिल शाहू दरबारीं, द्या मदत व्हावें कैवारी हो, बोलतां स्वारी, शाहू चिंताक्रांत अंतरीं ॥ चिमणाजी आप्पा शेजारीं, विनयानें शब्द उच्चारी, मला हुकूम व्हावा सरकारी हो, करिन मी स्वारी, पंचविस हाजार माझी तयारी ॥ मनीं युक्ती करून निरधारी आले शाहजतखानाचे द्वारीं, सल्लामसलत बाह्यात्कारी हो, सांगतां सारी त्यासी पटली गोष्ट उपकारी ॥ मो० ॥ बाजीरावाचे आमुचें आलें दरबारीं वाकडें म्हणून आलों तुम्हाकडे द्याल अभय रोकडें करिन सेवा येथुन पुढें आधार देउन आपणाकडे त्याणें पदरीं घेतली आपत्ती, आपत्ती हो पाहुनी वैरी कापती ॥ ब्रम्हवंशीं तेजोराशी ॥ ३ ॥ येकदोन जाता दीन संधी पाहुन छान गैरसावध मुसलमान हल्ला करुन दाणादाण केली

मोठी माराहाण भला चकविला खान सैन्याची केली धुळधाणी, धुळधाणी हो गवसली तिथें मस्तानी ॥ तिच्यापाशीं द्रव्यराशी जवाहिर फार त्यांत रूपवंत नार केवळ उर्वशी आवतार कोण पुढें सांभाळणार म्हणें प्राण मी देणार खाउनी जहर हिरकणी, हिरकणी हो तिची समजुत केली तत्क्षणीं ॥ रणगाझी चिमणाजी घ्याया जाबसाल केली निजामावर चाल मग डोळे करुनी लाल मागें मदतीसाठीं माहाल साठ लक्षाचें बाहाल बक्षीसपत्र घेउनी, घेउनी हो आले सातान्यासी परतुनी ॥ चा० ॥ शाहू प्रसन्न त्यास देखतां युद्धाच्या कथा साग्र ऐकतां इनाम दिले कैकाहो, कडी तोडे पैका ॥ कुल मुखत्यारी दिली पेशवाइ उणें मग नाहीं ब्रम्ह बादशाही वाजला डंका हो नउ खंड मुलखा ॥ जिला मानिली समस्तानी चतुर मस्तानी साऱ्या हिंदुस्तानीं तशी कोण आहे का हो, घरोघर बायका ॥ मो० ॥ यापरि खरोखरी स्वयंभू श्रृंगार वारि दिव्य आलंकार वय विसाचे सुमार गोल बांधा सुकुमार झाले बाजीराव गार तिची पाहुन स्वरुप संपात्ति, संपत्ति हो पाहुनी वैरी कापती ॥ ४ ॥ रंगमहालीं झाली बाहाली वचन मस्तानीस तुझ्या पुत्रसंततीस वसूल ज्याचा लक्ष तीस लाविन जाहागिरी दिमतीस ऐसें वचन देउन तीस वेवस्था केली सुंदर सुंदर हो तिच्या पोटीं समशेर बाहाद्दर ॥ पुणें शहरीं भक्कम भारी बांधियला वाडा वरी ठेविला चौघडा जिंकून हिंदूस्थान जाडा गुजराथ आणि काठेवाडा नेला आटकेवरी घोडा पराक्रम वर्णूं कुठवर, कुठवर हो ज्याची युद्धकला भयंकर ॥ सुरंग भेसल जिंकून अस्सल झाशी मुलखास घेउन उज्जयनी खास आले परतूनी पुण्यास वंदून गादीच्या धन्यास हात जोडून म्हणे त्यास काय सांगा स्वामी मजकुर, मजकूर हो जावे शीघ्र दाभाड्यावर ॥ चा० ॥ दाभाड्याचें कर्म अनुचीत मगरूरचीत्त हुकूम किंचित ऐकेना माझाहो, समाचार पहा जा ॥ बाजीराव तयार होउनी गेले धाउनी लढाई देउनी उभारिल्या फौजा हो, नित्य दम ताजा ॥ रणीं

ग्रंथ संग्रहालय ३१०५ २७

त्रिंबकराव दाभाडे चूर केली हाडें सैन्य चहुंकडे निकामी काजाहो, जिरल्या मौजा ॥ चा० दु० ॥ त्यांत दमाजी गायकवाड भारी, पेशव्यास झाला सहाकारी, त्याची पाहुन कर्तबगारी हो, दिली जाहागिरी, पाउण कोट वसुल निरधारी ॥ शेवटीं नर्मदातीरीं, कलमड़े प्रांतीं रावेरी, संपवूनी कार्य आवतारी हो, बाजीराव स्वारी, कैलासीं गेले माघारी ॥ शके सोळाशे बासष्ट वैरी, वैशाख शुक्ल माझारीं, त्रयोदशी तीथ दोन प्रहरी हो, सुवेळ अवधारी, इहलोक आटोपली वारी ॥ मो० ॥ नाना छंद कटिबंध कृष्णातिरीं वास नित्य पोवाड्याचा ध्यास रामचंद्र नांव ज्यास त्याच्या कवनीं आनुप्रास नित्य गुंफीतसे खास चित्त चालक श्री यदुपति, यदुपति हो पाहुनी वैरी कापती ॥ ब्रम्हवंशी ॥ ५ ॥

---

## २ श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा वध.

दख्खनचा दिवा मालवला हिरा हरपला । काय गुपीत घाला केला नारायणरावाला । कशी करुणा नव्हती आली राघोबाला । अपघात करुन मारिलें सख्ख्या पुतण्याला ॥ ध्रुपद. ॥

एकछत्र करुनि गेले राव माधवराव । थरथरां कांपत होते अष्ट उमराव ॥ बसविलें हस्तिनापुर राज्य पाच्छाव । दादासि मोकळे केलें राज्य कराव ॥ तुटली आयुष्याची दोरी नाहीं उपाव । त्यांनीं मरते समयीं बोलाविलें नारायणराव ॥ उपदेश केला भरलीं नेत्रीं आसवं ॥ दादांसि मिळोन असावें ॥ रयतेला दुःख न द्यावें । द्वैत केवळ न करावें । प्रीतीनें राज्य करावें ॥ पुणें गादी सांभाळूनी रहावें । माझ्या मोक्षपदचें वचन संभाळावें ॥ (चाल) आनंदीबाईला जवळ बोलाविलें । बया आम्हीं जातों मोक्षपदाला तुम्हा कळविलें ॥ ओट्यांत नारायणराव तुमच्या घातला । बहु प्रकारें विनविलें

आनंदीबाईला । मग माधवरायानें प्राण सोडिला । कशी करुणा नव्हती भगवाना तुला ॥ अपघात करुनि मारिला सख्या पुतण्याला ॥ दख्खनचा १ ॥

श्रीमंती राज्यामधि पुण्याची महिमा कशी होती । जागजागीं अनुष्ठानें ब्राह्मणभोजनें होतीं ॥ चोहोंकडे राज्यामध्यें वेदघोष चालती ॥ तुपपोळी खायाला नव्हती ब्राह्मणांस निवंती । कशा नालख्या पालख्या घरोघर फिरती ॥ स्वारी श्रीमंतांची नित्य पर्वतीला जाती । काय आरसेमहाल मजा दिसे वाड्याची ॥ सोन्याचा गणपती पूजा श्रीमंतांची ॥ बुधवारचा वाडा मसलत पंचाइतीची ॥ कारंजेवाडा सदर नाना भाऊची ॥ चाल ॥ काय बैठक रावसाहेबाची ॥ पानाविडे मजा खायाची ॥ लोक येतात मुजऱ्याशी । गुणी चतुरजन दाविती चातुर्यांशी ॥ गुण पाहून देती तनख्याशी । कारंजें लाविलीं वाडयांमधीं पाण्याचीं ॥ जुना वाडा बांधला बुरुज लढायाशी ॥ चाल ॥ नळाला काम लाविलें, हुकूम झाला । पुढें कोट बांधणार होते शहर पुण्याला ॥ पण करुणा नाहीं आली भगवाना तुला । अपघात करुनि मारिलें सख्या पुतण्याला ॥ दख्खनचा० ॥ २ ॥

माधवराव मोक्षपदाशीं गेला । चिंता पडली नानाफडनविसाला ॥ नारा- यण महाराज नेले साताऱ्याशी ॥ शाहूरायाच्या तक्तापाशीं ॥ शिक्के कट्यार वस्त्रें दिलीं नारायणाशी । पुण्याची गादी मिळाली नारायणाशी ॥ जणुं सूर्यनारायण उगवले आकाशीं । आला वाजवीत चौघडा शहर पुण्याशी । कूच करुनि लौकर नेले नाशकाशी ॥ दुसऱ्याची बुद्ध ऐकत निमित्याशी ॥ मग येउनि जती केली नारायणाशी ॥ चाल ॥ फार झाले बंदोबस्ती ॥ घोड्याची गस्त हिंडती । चौक्याची बंदोबस्ती । नारायण धरायासाठीं ॥ आनंदीबाईनें मांडली हिकमती ॥ माझ्या राज्यपदाची माळ गंगाबाईला दिली कशी ॥ चाल ॥ पुढलें होणार जाणार ठाऊक कोणाला ॥ होयाचें होऊन जाईल शब्द देवाला ॥ नारायणराव आमुचें मुकले हो प्राणाला ॥ दख्खनचा० ॥ ३ ॥

भाद्रपद तेरशी दिवस सोमवार त्या दिवशीं, दिवस चढला दोन प्रहर॥ सुमेरसिंग गारदी होऊन तयार॥ त्या आनंदीबाईनें बोलाविला कचेरीवर॥ आनंदीबाई बोले सुमेरसिंगाला । तुला भाऊ म्हणोन माझा मी मानिला॥ जर खरें सांगशील मला आनंदीबाईला॥ हें पुणें शहर अर्धे देईन तुला॥ बेल भंडार तुळशीपत्र इमान तुलानू मला। दोघांची क्रिया झाली बेल-बागाला॥ राजपद कोणाला दिलें सांग आम्हांला॥ मग सुमेरसिंग गारदी बोले बाईला॥ राजपद दिलें आई दादांनीं नारायणाला॥ चाल॥ आंग टाकिती धरणीला॥ तोडी कुरळ्या केंसाला॥ राज्याचा नाश माझ्या केला॥ शिव्या देती राघोबादादाला॥ चाल॥ माझा हुकूम जाऊनि सांग माझ्या नवऱ्याला॥ नारायण धरुनि आण माझ्या कचेरिला॥ नाहीं तर कुंकूं पुशीतें मी आपल्या सदरेला॥ दख्खनचा० ॥ ४ ॥

सुमेरसिंग गारदी होउनि तयार॥ मला हुकुम व्हावा आनंदीबाई म्हणूनि लावी कट्यार॥ मग शिरला आरसे महालांत उपसुनी तरवार॥ हजार गारदी शिपायी बरोबर॥ हातीं नागव्या तरवारी हातामधिं भाले। त्यांनीं आरसे महाल वेढिला चौफेर॥ केशरीभात जेवले होते नारायण॥ ह्या राजवाड्या-मधिं झाले निद्रा शयन ॥ चाल॥ झाली गर्दी येकच हल्ला॥ पर्वती आई गेली स्वप्नाला। उठ नारायण आतां तुझा घात आला॥ राव स्वप्निं जागा झाला। उठोनि उभा राहिला। राजपुत्र थरथरां कांपला। पाणी आलें त्याच्या नेत्रांला। राजपद भोंवलें मला। नऊ महिने नाहीं भोगलें पुरतें राज्याला॥ डोळाभर नाहीं पाहिलें अस्तूरीला॥ आनंदीबाईनें आतांच घात मांडिला॥ आई बाप नाहीं जवळ सोडवायाला॥ नाना फडनवीस नाहीं पुण्याचे सदरेला॥ नारायण पळों लागला, आसरा नाहीं लपायाला॥ गाय होती देवपूजेला॥ गाईच्या आड लपला मिठी गाईच्या गळ्याला॥ गाईशीं बोलुं लागला। गोमाता म्हणती तुला॥ प्राण वांचिव आतां आपुला॥ गाय हंबरती खाशाला॥ पाणी गाईच्या डोळ्याला॥ सुमेरसिंग

उभा राहिला तोडायाला ॥ गाईला वार लागला आसरा गाईचा सोडी-वला ॥ नारायण पळों लागला । हिंडोन सारा वाडा भयाभीत झाला । थरथरांच कांपत राघोबा दादापाशीं गेला ॥ दख्खनचा० ॥ ५ ॥

जिथून पळाले राव सुमेरसिंग माग । बरोबर घेउनि गारदी केला लाग । शोध करित पुढें चालले लावला थांग । म्हणे येथून पळाले राव, आनंदी-बाई सुमेरसिंगाला सांगे ॥ मग गेले दादापाशीं सोडा राग ॥ मला द्यावें जीवदान टाकावें मागें ॥ चाल ॥ डोई घातली पोटांत ॥ मीठी मारितो गळ्यांत ॥ राजपद नको मला इथें ॥ माझ्या प्राणाचा होईल घात ॥ आनं-दीबाईचें चुलतीचें ऐकूं नको ॥ भट ब्राह्मण मला म्हणतात ॥ मी कोरण भिक्षा मागत जातों काशी तीर्थांत ॥ माझी गंगातिरीं अस्तुरी द्या माझ्या संगत ॥ दादासाहेब पुरवा माझा मनोरथ ॥ आली माया हृदयांत ॥ दादा-साहेब बोले सुमेरसिंगास नको करूं मुलाचा घात ॥ चाल ॥ माझ्या वडील भावाचा लेक ॥ राज्याला एकुलता एक ॥ शिर ठेविलें रायाचे हातीं वांचवा याला ॥ पुढें सुमेरसिंग गारदी दादासाहेबास बोलता झाला ॥ दख्खनचा० ॥ ६ ॥

अन्न पाणी लागेना गोड चैन पडेना आनंदीबाईला ॥ बारावर एक वाजला घंटा झाला ॥ कां अजून सुमेरसिंग येईना सांगायाला ॥ मग सुमेरसिंग गारदी जवळ बोलाविला ॥ काय हुकूम दिला दादांनीं सांग मेल्या मला ॥ मग सुमेरसिंग गारदी बोले बाईला ॥ दादासाहेब हुकूम देईनात नारायण धरायाला ॥ किती शिकवूं ह्या मेल्याला बाई शिपु-र्ड्याला ॥ चाल ॥ तीनरुपयाच्या चाकराला । काय पुढलें होणार ठाऊक नाहीं ह्याला ॥ राजपद दिलें दादांनीं नारायणाला ॥ सर्पाच्या पाठीवर मेल्या तूं पाय दिला ॥ पुढें घात तुझ्या जीवाला ॥ तुझीं लेकरें बाळें पुढें विकील ढाणकाला ॥ होयाचें होऊं दे जीवें मार दोघांला ॥ दख्खनचा० ॥ ७ ॥

 मं. काव्य ०९

सुमेरसिंग गारदी बोले मग दादाशीं ॥ यामुळें आपला प्राण तुम्ही त्यजिता ॥ पुढें आमचीं मनुष्यें कशीं घाण्यामधें गाळवितां ॥ दादांनीं हात काढिला मग झाला परता ॥ तुळाराम परदेशी नारायणाला झाला ओढिता ॥ वैऱ्यानें हात टाकिला खांद्यावरता ॥ चाल ॥ झाली मुक्त एकच घायीं ॥ रक्त वस्त्रें भिजली बाही ॥ रक्ताचे पूर वाही ॥ एक शकल झालं दुठायीं ॥ मधें जानव्याचे हाल झाले कांहीं ॥ कढी भात पडला ठायीं ॥ चकचकती सगळी शाही ॥ नारोबा नाईक पुरा झाला ॥ जखमा लागल्या विश्वराम ढेऱ्याला ॥ पर करुणा नाहीं आली भगवाना तुला ॥ चाल ॥ अखेरी सांगतों तुम्हाला ॥ भाऊबंदकी भोंवली नारायणाला । दुर्बुद्ध झाली बाइला । राघोबाला विचार नाहीं राहिला । घुतण्याचा वध त्यानें केला । गाइचा वध तिथें झाला । अपशकुन झाला देशाला । होयाचें होऊन गेलें शब्द देवाला ॥ दख्खनचा ॥ ८ ॥

---

## खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा.

श्रीमंत पेशवे सवाई माधवराव ॥ गोकुळीं उभारिल्या गुढ्या जन्मला देव ॥ झाला म्हणती कृष्ण अवतार, करिती जयजयकार, शूर जसे भीमार्जुन पांडव ( दुष्मन कांपे थर थर, झाले बेजार, वीर जसे भीमार्जुन पांडव. ) ॥ ध्रु. ॥

१

राजाधिराज, महाराज, गरिब नवाज, धनी श्रीमंत ॥ भासती सदैव देव आमुचे हेचि भगवंत ॥ पाषाण धातूच्या मूर्ति, धरत्री वरती, जागोजाग किती, आहेत अनंत ॥ त्या पूज्य परंतु नाहींत प्रगट जीवंत ॥ तसे नव्हेत हे तर देव, कलीमध्यें भूदेव, ब्राह्मण संत ॥ त्यावंशीं पेशवे जाहले

सबळ बळिवंत ॥ त्यांचे वंशीं सवाई माधवराव, जन्मले देव, कृष्ण अवतार तसें केलें नांव ॥ प्रजेला जाहला आनंद, करिती जयजयकार, त्यांचे यश गाव ॥ १ ॥

२

तो पांडवांचा अर्जुन यशश्वरी ॥ ती पहिली निघाली स्वारी मोंगलावरी ॥ त्यांनीं डेरे दिले समद्यानी गारपिरावरी ॥ तो मोंगलाचा वकील विनंत्या करी ॥ ते दौलतराव शिंदे अघाडी बिनीवरी ॥ त्या होळकराची फौज गर्जत भारी ॥ त्या बाबा फडक्याची कोरबंदी न्यारी ॥ त्या जरीपटक्याखालीं हुजूरात चाले सारी ॥ चाल ॥ राव माने मानकर, घाटगे पाटणकर, यादव निंबाळकर, ते घारूकर भोसले किं सुपेकर स्वारी बरोबर ॥ मोहिते व शिरके येऊन मिळाले रणावर ॥ ते गणेशपंत ढमढेरे आले बहाद्दर कीं सवते दूर ॥ ते मानाजी फाकडे भले रणशूर मारी तरवार ॥ चाल ॥ चालतांना स्वारी शोभती, कोरबंदी जपून चालती ॥ अशा सरदारांच्या गती ॥ कालुकर्णे बाजे वाजती ॥ आपलाले बिनीवर हत्ती ॥ पुढें सांडणी स्वार धांवती ॥ दळाची खबर आणती ॥ पुढें घोडेस्वार धांवती ॥ एकमेकां इशारत देती ॥ शिस्ती शिस्तीनं चालावं म्हणती ॥ घोडेदळ पायदळ कोठवर पहावं ॥ २ ॥

३

तो पहिला शहाणा नाना नांव साजे ॥ त्यानं श्रीमंताचं भले राखिले राज्य ॥ अशी पुण्यपवित्र खलबतें होतीं रोज ॥ ते पंत प्रतिनिधी जसें सूर्याचें तेज ॥ ते आपाजी बळवंतराव भुजेशीं भुज ॥ ते भवानराव घाटगे नांव साजे ॥ त्या पानशावर रावसाहेबांची लई रीझ ॥ त्या रास्त्याचा हमेश डंका वाजे ॥ चाल ॥ अशी गडबड जाहली फार शिलेदार घोडे मिळेना ॥ दोघांचे घोडे चौशाला अशा खाशाला कोणी देईना ॥ इसाच तट्टु साठाला अशा दाटीला कुठं मिळेना ॥ भिवरेवर पडला तळ रयत तळमळ, करिती

सं. ग्रंथ ८८८
०१ ग्रं. ०५ ०१

हळहळ, नजर थांबना ॥ दाण्याचं झालं हातरूण, खुशाल पाहून, कोण घेईना ॥ बायकोचं काढलं मोतीं, घेतलं हातीं, इचार मग करिती, गुजर ढेविना ॥ टक्क्याच रुक पायलीला, दळणवालीला, दळून देईना ॥ चाल॥ तीन लक्ष मिळाल दळं, आपुलाले घरती विलं, लष्करांत पडली भूल, मोठ मोठ कीं लढनवाले, मोठ मोठ कीं समलेवाले ॥ ते नारोशंकर विठ्ठल शिवदेव ॥ ३ ॥

४

गेले कागद नागपुरा कीं भोसल्याला ॥ दरकूच येऊन शिनवरती मिळाला॥ तो जिवबादादा बक्षी मग उठला सिंह जसा गर्जला॥ ते वेळे काय बोलला माधवरावाला॥ त्यो कसला मोंगल अन् काय जिन्नस आहे पाहूंद्या मजला ॥ तो कंचा फिरंगी गोळा मारनेवाला ॥ फौजेंत केली ताकीद सड स्वारीला । त्या गणेशपंत भेऱ्याला बाबा फडक्याला ॥ त्या परशराम भाऊला जिवबादादाला ॥ तुम्ही मिळुनशेनी जावे हो झुंझायला ॥ हर हर बोलती मरूं कीं मारूं या समयाला ॥ चाल ॥ मोंगलानं गलीम पाहिला, घोडा सजविला, तयार मग जाहला, कीं त्या रंगणांत ॥ भले भले मायेचे पूत, सुरे हातांत, मारिती हात ॥ ते रावरंभा सरदार भले रणशूर, बसून हौद्यांत, तिरंदाजींत ॥ ते मशुलमुलुख , हौद्यांत बसून हाणा हाणा असें म्हणवीत ॥ चाल॥ बहु कोस मागें सारिला, मार पडली हुजुरातीला॥ त्या परशुराम भाऊला॥ त्या बाबासाहेब फडक्याला॥ जखमा चढल्या मर्दांला ॥ अशा कैक सरदारांला ॥ जीवाची पर्वा नाहीं त्यानला, देह वाहिले स्वामीकार्याला । मग जिवबादादा काय बोलिला। इथंच मरूं अन् जाऊं आम्ही स्वर्गाला । राखूं मराठ्यांच्या नांवाला, घेऊं छत्रपतीच्या नांवाला । हरहर बोलती हाणा म्हणती शत्रूला, रणखांब रोविला मुकाम घोडेगांवाला । मराठा गर्जू लागला । गर्जना करिती हर हर महादेव ॥ गर्जना करिती छत्रपति शिवदेव ॥ ४ ॥

५

आला मोंगल देशावर कळल्या खबरी । गावात् गांवं ओस पडलीं सारीं । ही पुण्यप्रतापी रावसाहेबाची स्वारी । त्या शाहूरायाचा हात पुरता शिरीं । त्या बुधवारच्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं ॥ त्या जिवबादादानं तोफा लाविल्या दुहेरी ॥ त्या भोसल्याच्या बाणाच्या कसल्या भरारी ॥ जशी हनुमंतानं लंका जाळिली सारी । तेंवि सवाई माधवराव यशश्वरी ॥ हाणा हाणा म्हणून निशाणं उठलीं सारीं ॥चाल॥ मोंगलान गलिम पाहिला पळ काढला, पीर कोपला, अशा समयाला ॥ शत्रूला धीर नाहीं राहिला, झाला गलबला, करिती मग अल्ला ॥ मराठ्यांनीं कावा साधिला, लुटी फार केल्या, घाला घातला, रात्रीं समयाला ॥ खर्ड्यास नेऊन घातला नबाब साहेबाला ॥ पाण्याचा झाला कहर, करिती हाहाःकार, दाणा शेरभर, आला कवलाला ॥ मग नबाब बोलता झाला माधवरायाला ॥ चाल ॥ राव देतों मी खंडणी ॥ घ्या मुलूख तुम्ही लिहूनी ॥ मश्रूल्ला देतो घनी ॥ तेव्हां परशुराम भाऊंनीं ॥ रावसाहेब नाना फडनीसांनीं ॥ मनसुबी केली बैसूनी ॥ दिलीं निशाणं सोडुनी ॥ आले पुण्याशी निघूनी ॥ यश घेतलें पांडवांनीं ॥ बहुरंग्याची लावणी ॥ पवाडा केला मर्दांनी ॥ त्या गुरुरायाचें वदन नित्य पहावं ॥ ५ ॥

---

## पांच अंकी नाटक—पोवाडा.

### शके १५२० ते १७४० पर्यंत.

पांच अंकाचें नाटक साचें माहाराष्ट्राचे भूमीवरी, मुख्य वेष शिव प्रभू घेउनी सूत्रें चालवी परोपरी ॥ धृ० ॥ शके पंधराशेवीस रंग पंचमीस सुदिन सुमुहूर्त योजीला, विनोद वाक्य या नाटकासी पाया दिली जिजाबाइ शाहजीला ॥ मालोजीस तन्निमित्त त्रास सेवा पाश त्याणें त्यजीला, सत्ता स्वतंत्र हातांत यावी म्हणून जगपिता शिव पुजीला ॥ प्रसन्न झाली गौरी

दा. क्र. 3513

माउली भक्त उतरला मर्जीला, धन देउनी साधन याच कुळीं आवतार घ्या म्हणे शिवजीला ॥ चाल ॥ मालोजी पराक्रमी खरा, आपमान साहिना जरा, राज्यासी लावी दरदरा, मग बादशहाचें आंतराहो, दुर्धर पडलें साकडें ॥ मारुनी डुक्कर उठाउठी, त्याचे गळ्यांत बांधुन चिठी, टाकी मसूदींत शेवटीं, आगळीक लाऊनी घटीहो, हा हा कार करी चहुंकडे ॥ बादशहाला उमजतां मूळ, म्हणे जाधवांचें हें खूळ, भोसल्यासी होउन अनुकूळ, जाहागिरी देउनी स्थूळहो, लाविलें लग्न फाकडें ॥ मो० ॥ राजे किताब नावासी जोडूनी दानधर्म सत्कर्म करी, प्रथम अंक संपवूनी शेवटीं गेले मालोजी मोक्षपुरीं ॥ पांच अंकाचें नाटक ॥ १ ॥ अंक दुसरा शहाजी वीरा चहुकडुन भरभर चढली, वीर्य शौर्य चातुर्य पाहुनी यवन पातशाही गडबडली ॥ नगर विजापूर, हालवितां भरपूर नरद नाहीं कोठें नडली, धैर्य उल्हासे द्वादश वर्षें मराठी सेना बहु लढली ॥ स्वधर्मग्लानी स्वराज्यहानी स्थिती पाहुनी चहुकडली जिजाइपोटीं येता धूर्जटी राष्ट्राची कुदशा दडली ॥ चा० ॥ साऱ्या जगांत पहिला नंबर, शिवराय बांधुनी कंबर, रिपु जिंकुनी आवडंबर, केलें स्वच्छ राष्ट्र आंबर हो, तेजस्वी ग्रीष्म तरणीसा ॥ रायगडीं राजआश्रम, त्याचा आद्भूत पराक्रम, शत्रूसी पाडिला भ्रम, रामकृष्ण तिसरा विक्रमहो, हा चौथा शिवाजी तसा ॥ दोन तपांत राज्य स्थापिलें, महाराष्ट्र सर्व व्यापिलें, चरचरा यवन कापिले, जन सुखी करुनी आपुलें हो, म्हणे स्थान सांभाळुनी बसा ॥ मो० ॥ धर्म आर्थ काम मोक्ष यथार्थ चारी पुरुषार्थ तो आचरी, द्वितीय अंक संपवुनी शेवटीं गेले शिवाजी मोक्षपुरी ॥ पांच अंकाचें नाटक ॥ २ ॥ अंक तिसरा बसला घसरा शंभू गवसला रिपु अहिला, स्वधर्मास्तव प्राण दिला पण विधर्मास मुळीं नच वाहिला ॥ शिवाजी पहिलें पुन्हा आवतरले शाहू नाम घेउनी महिला, भोगुनी संपत्ति धरिला हातीं प्रधान बाजीराव पहिला ॥ ब्राह्मणवीर प्रतापी धीर चतुर शूर रणपटु वहिला, शिंदे होळकर इमानी नोकर सुयश भाग भाळीं लिहिला ॥ चा० ॥ वीर बाजीराव आदभूत, जणू जमदग्नीचा सूत, यवनासी आणिला मूत, बादशहाला सांगती दूतहो, सैतान बाजीराव बडा ॥ दिल्ली तक्त बादशाही

काम, सहा सुभ्याचा सरंजाम, सरदार मुख्य निजाम त्यावीण इतर सब हजाम हो यवनांना डौल कोरडा ॥ राजकारणपटु रणगाझी, ज्याला शाहू छत्रपती राजी, ब्राह्मणांत पेशवा बाजी, त्यावीण इतर सब पाजीहो, खाउ सराब आवघी पीडा ॥ मोड ॥ हिंदुस्थान कर्नाटक जिंकून झेंडा लाविला आटकेवरी, तृतिय अंक संपवुनी शेवटीं गेले बाजीराव मोक्षपुरीं ॥ ३ ॥ चौथ्या अंकीं तर रंगभूमिवर नाना भाउची आली जोडी, साम्राज्याला कळस चढविला आटक नदीस न्हालीं घोडीं ॥ कुरुक्षेत्रावर लढले भयंकर गिलचे पेशवे बिनतोडी, नाश करुनी दोघांचा आपेश पेशव्यासी सपशिल झोडी ॥ अंक पांचवा करारी बिचवा माधवराव बहु यश जोडी, नारायणरावाचा आपघात नंतर सवाई माधव प्रभु धाडी ॥ चा० ॥ ते सवाइ माधवराव भले, राज्य करुन मोक्ष पावले, फडके, पटवर्धन हारपले, मग दुसरे बाजीराव आलेहो, शेवटीं रंगभूमीवर ॥ कैलासी गेलें फडणीस, लागलें पाप चढणीस, मत्सर कुबुद्धि गडणीस, म्हणे पीक आलें काढणीसहो, स्वातंत्र्य हारवि लौकर ॥ महा रणशूर सेनापती, बापु गोखले पडले रणक्षिती, रावबाजीस आधोगती नाटकास काळ गेला कितीहो, दोनशे वीस वत्सर ॥ मो० ॥ खेळ आटोपला पडदा पडला झाली शांतता घरोघरीं, रामचंद्राचें रसाळ काव्य रमवी रसज्ञा खरोखरीं ॥ पांच अंकाचें नाटक साचें ॥ ४ ॥

---

## सरदार बापु गोखले—आष्टीची लढाई—पोवाडा.

महा रणशूर सेनापती पराक्रमी आती वर्णु मी किती जयाचें बापू गोखले नांव, रणांगणीं कडोविकडीचे डाव, पाहुनी पळती शत्रु उमराव ॥ धृ० ॥ इंग्रज पेशव्यांचा तंटा वाजला घंटा फिरला वरवंटा हिंदूंच्या स्वातंत्र्यावरी खास, खडकीवर घडकी भरली कितीकास, राव बाजीच्या शिपाइ लोकांस ॥ घेउनी तळहातीं शीर मुत्सद्दी वीर देतसे धीर गोखले बापु सैनिकांस, ढासळुनी पडलें जरीं आकाश, भिउ नका युद्ध करा सावकाश ॥ मग धावत्या लढाइची हूल नकळे चाहुल शत्रुसी भूल पाडुनी केला जागोजाग नाश, फिरविला इंग्रज चौमुलखास, आशापरी

मराठी ग्रंथ सं...

खेळविला षण्मास ॥ चाल ॥ राव बाजीनें सत्वर, बोलाविले आपुले सरदार ॥ गायकवाड शिंदे होळकर, भोसले पटवर्धन वीर ॥ येकदिल होउन तयार, मदतीस यावें लौकर ॥ चा० दु० ॥ वडिलांनीं खर्ड्यावर मोंगल बडविला जसा, इंग्रजांस तुम्हीं आम्ही हात दाखवूं तसा, येतो येतो म्हणून नको वरकरणी भरवसा, आपसांतील तंटे नंतर उकरीत बसा, न याल तरी तुमचाची घात पहा कसा, जाईल स्वराज्य स्वातंत्र्याचा ठसा, परसत्ता पोराबाळासी लाविल वसवसा, शिवछत्र राखावें नका उगलु कोळसा ॥ मो० ॥ फितुरीचें इंग्रजी सूत्र फिरलें सर्वत्र होउ स्वतंत्र नको नको म्हणती पेशवाइ नांव ॥ रणांगणीं कडोविकडीचे डाव ॥ १ ॥ पेशव्यानें विचार केला मनीं साह्य नाहीं कोणी ठेविला झणी फिरता मुक्काम प्रसंग देखून, वीस कोस त्यांना पुढें टाकुन, बापु होते शत्रु सैन्य रोखून ॥ सेनापती साहेब स्मीत केला विस्मीत सूर्य रश्मीत दिवसा कोरेगांवीं दंड ठोकून, इंग्रजांवरी गोळ्या फेकून, केली धुळधानी भाले भोसकून ॥ थोडकेंच बापुचें सैन्य विरश्री वन्य त्यांत आगरगण्य मुधोळकर पाछापुरकर ऐकुन, घोरपडे शितोळे आवलोकुन, शत्रुची जाय कंबर वाकुन ॥ चा० ॥ पेशव्यानें युक्ती लढवीली, साताराची हूल दाविली ॥ स्वारी फलटण प्रांतीं गेली, कंबळेश्वरी वस्ती केली ॥ बापुनें साताऱ्यास भली, शत्रुची फौज कोंडली ॥ चा० दु० ॥ इतुक्यांत बाजीराव आले मग पंढरपुरीं, इंग्रजी फौज आली तात्काळ आष्टीबरी, बापू म्हणे श्रीमंतास मुकाम सोडा लौकरी, आपुल्याहूनीं चौपट शत्रुसेना खरोखरी, आपासाहेब निपाणकर पेशव्यास आग्रह करी, पौर्णिमा उद्या स्नान भोजन झालियावरी, तुम्ही खुशाल जावें मज वाटे अंतरी, बापु आसल्यावर काय शत्रुची मातबरी, ॥ मो० ॥ बापू म्हणे ऐका लक्षण करीन रक्षण नलगतां क्षण आतांचे आतां सोडा हें गांव ॥ रणांगणीं कडोविकडीचे डाव ॥ २ ॥ पेशव्यासी पडला आग्रह उलटला ग्रह विचार विग्रह बापुच्या आंतरीं भरला कोप, उणें उत्तर झाला आरोप, बापू अंतीचा घेई निरोप ॥ लक्ष्मणसींग जामदार म्हणे आले स्वार शत्रु आनिवार जवळ आले उठा धेउं नका झोप, तयारिची सुचना उडविली तोफ, सजवीर

झाले घालून शिरीं टोप ॥ पांचशे सैन्य बरोबर बापू रणशूर आले सत्वर आष्टीच्या रणांत देउ म्हणे चोप, आपुर्व इरषा आंतरीं घोप, शत्रुचा करुं म्हणती निर्लोप ॥ चा० ॥ शस्त्रास्त्र सज्य आटोकाट, शत्रुची पाहती वाट ॥ इंग्रजी फौजेचा थाट, मुंगळ्याचे रिंवण जणू दाट, दोघांची पडतां गाठ-रक्ताचे लोटले पाट ॥ चा० दु० ॥ इंग्रजी फौज नदी उतरतांच बड-विली; पहिस्या घडकेंत बापुनें दाणादीन उडविली, फाटाफुट त्याची त्यानें शिखस्तीनें जुडविली, देउनी हुकुम येकदम गोळी झडविली, घनघोर युद्ध मराठ्यांची निशा उडविली, पेशव्यांची चढाई त्या इंग्रजांनीं उडविली, तोंड धरीना फौज बापुनें छाती बडविली, वीर म्हणती पळा आम्हीं जोंवर वाट आडविली ॥ मो० ॥ बापु विरश्रीनें गर्जुनी मिशा परजुनी हालवी तर्जनी षंढ कोण पळेल थुः त्याचें नांव ॥ रणांगणीं कडोविकडीचे डाव ॥ ३ ॥ मग पन्नास रण-बाहद्दर घेउनी बराबर शत्रु चराचर कापीत गेले फळी फोडून, फडकरी ऊंस टाकी तोडून, तसे पाडिले शत्रु मोडून ॥ गाठुनी स्मीथ साहेबास दरडावूनी त्यास द्वंद्व युद्धास चलो आव म्हणे टोपी काढून, तटस्थ पाहती नेत्र फाडून, मंडळाकार शिपाई झाडून ॥ बापू रणपटु कर्दनकाळ साहेबाचा बाळ रक्त बंबाळ जेर केला जखमी वर्मीं तोडुन, प्राण घेउं पाहे लाथाडून, धावले सोल्जर मग चहूंकडुन ॥ चा० ॥ बापू साहेब येकले येक, सोल्जर भोंवतीं आनेक ॥ घनझुंबर झाली चकमक, बहु मारिले इंग्रज लोक ॥ येकस्यानें केलें कौतूक, आभिमन्युसारखे देख ॥ चा० दु० ॥ सहस्रात येकटा काय करील तो तरी, शके सत्राशें येकुण चाळिस सवत्सरीं, माघ महिना शुद्ध पौर्णिमा पहिल्या प्रहरीं, दिवा मरण उत्तरायण रणा भीतरीं, बापु गेले मोक्षाला कीर्ति करुन जगभरीं, माहाराष्ट्र शौर्य लोपले कोप ईश्वरी, कवि रामचंद्र करी जुळणी कृष्णेच्या तिरीं, प्रासादिक यमकामधें रंग परोपरी ॥ मो० ॥ रावबाजीस आधो-गती झाली मिश्चिती कर्माची गती ब्रह्मवर्तास मिळाला ठाव, आठ लाख पेनशन रोख ठराव, ब्रिटिश आम्मल झाला फैलाव ॥ ४ ॥

---

3693